# बी.ए. भाग -१, सत्र - १
# विषय – मराठी (आवश्यक)
# पाठ्यपुस्तक – शब्दसंहिता

## घटक – भाषिक कौशल्ये

प्राध्यापकाचे नाव – डॉ. अमोल सुभाष कवडे

# भाषिक कौशल्ये

- कोणतीही भाषा शिकणे म्हणजे भाषिक कौशल्याचा विकास करणे होय.
- श्रवण, वाचन, भाषण आणि लेखन ही मुलभूत भाषिक कौशल्ये आहेत.
- श्रवण व वाचन ही कौशल्ये आकलनाशी संबंधित आहेत’
- भाषण व लेखन ही कौशल्ये अभिव्यक्तीशी संबंधित आहेत.
- या चारही भाषिक कौशल्याचा विकास दैनंदिन जीवनात आणि ज्ञानप्राप्तीत महत्वाचा आहे.
- संभाषण हे पाचवे कौशल्य काही अभ्यासक मानतात.

# श्रवण

- विशिष्ट संदेश देणारे अर्थपूर्ण ध्वनी लक्षपूर्वक ऐकणे व त्याचा अर्थबोध होणे म्हणजे श्रवण होय.
- समोरच्या व्यक्तीने बोललेले शब्द नीट ऐकणे व त्याला काय म्हणायचे आहे हे समजून घेणे या प्रक्रियेला श्रवण असे म्हणतात.
- मौखिक संभाषण समजून घेण्याची व त्याला अनुसरून परिणामकारक प्रतिसाद देण्याची कुवत ज्यामुळे निर्माण होते, ते श्रवण कौशल्य होय असे डॉ. दत्तात्रय गंधारे म्हणतात.
- श्रवण हा संपूर्ण ज्ञानप्रक्रियेतील पायाभूत घटक आहे
- श्रवण चांगले असेल तर भाषण – संभाषण या क्रिया जमू शकतात.

# श्रवणाचे फायदे

- व्यक्तीच्या जडणघडणीत, व्यक्तिमत्व विकासात श्रवण कौशल्य महत्वपूर्ण ठरते.
- लक्षपूर्वक ऐकणाऱ्या व्यक्तीच्या आकलनाचा स्तर खूप वरचा असतो.
- बहुश्रुत व्यक्ती अनेक विषयात पारंगत असते.
- श्रवणमुळे विषयाची खोली व व्याप्ती कळू लागते.
- उत्तम श्रवण असणारी व्यक्ती समोरच्या बोलणाऱ्या माणसास त्याच्या भाव- भावना दृष्टीकोन यासह ओळखू शकते.
- उत्तम श्रवणामुळे गैरसमज होत नाहीत, संवाद व्यवस्थित होतो.
- उत्तम श्रवण असणारी व्यक्ती इतरांना प्रिय व वंदनीय असते.

# श्रवण कौशल्य सुधारण्याचे उपाय

- श्रोत्याने सर्वप्रथम स्वतःच्या मनावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करावा.
- लक्षपूर्वक ऐकणे ही स्वतःचीच गरज आहे, हे मनावर बिंबवावे.
- बोलण्याचा विषय याबाबत सकारात्मक विचार करावा.
- श्रवण करताना मनामधील राग – लोभ भावनांचा प्रक्षोभ टाळावा.
- ऐकत असताना इतर कृती टाळाव्यात, उदा, दुसरीकडे लक्ष, मोबाईलवर चाळे
- अवधान देऊन श्रवण करणे.
- बोलणाऱ्यांची भूमिका, भावना, दृष्टीकोन समजून घेणे.

# वाचन

- वाचन ही निर्भेळ आनंद देणारी प्रक्रिया आहे. वाचता येणे हे एक चांगल्या बौद्धिक क्षमतेचे लक्षण आहे. वाचन ही सहजपणे चालणारी प्रक्रिया असली तरी ते एक प्रकारचे कौशल्यही आहे. वाचन क्षमता जसजसी विकसित जाईल, तसतसा वाचनानंद वाढतो, वाचनाचे महत्व पटते आणि त्यामुळे माणूस प्रगल्भ बनतो. लिहलेला किंवा छापलेला मजकूर वाचणे म्हणजे वाचन कौशल्य नव्हे, तर लिहिलेल्या मजकूर वाचणे आणि त्याचा नेमका अर्थबोध होणे याला वाचन कौशल्य असे म्हणतात. वाचन कौशल्य ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.
- मूकवाचन आणि प्रकटवाचन असे वाचनाचे प्रकार पडतात.
- लिहिलेला मजकूर जसा लिहिला आहे तसा योग्य क्रमाने, आवाजात चढ –उतार करत तसेच मजकुरातील भवं उच्चारातून व्यक्त करत वाचणे म्हणजे प्रकट वाचन होय.
- मूकवाचन हे मनातल्या मनात चाललेले असते
- वाचनाचे सूक्ष्म वाचन आणि स्थूल वाचन असेही दोन प्रकार पडतात.

# वाचन कौशल्यात येणारे अडथळे

- वाचन कौशल्यात तीन प्रकारचे अडथळे येतात.
- १) बाह्य अडथळे २) शारीरिक अडथळे ३) मानसिक अडथळे
- बाह्य अडथळे यामध्ये शांत वातावरणाचा अभाव, अचानक व्यत्यय आणणाऱ्या व्यक्ती, मध्येच लागलेले काम यांचा समावेश होतो.
- शारीरिक अडथळे यामध्ये आजारपण, झोप, थकवा, शारीरिक दुर्बलता, भूक लागणे दृष्टीदोष, एकसलग बसण्याची सवय नसणे यांचा समावेश होतो.
- मानसिक अडथळे यामध्ये उदासीनता, निरुत्साह, अरुची, मनात राग – द्वेष – प्रेम – असूया या भावनांचा उद्भव, मनाची चंचलता, अचानक मनात येणारे विचार यांचा समावेश होतो.

# वाचन कौशल्य विकासाचे उपाय

- नेहमी शारीरिक स्वस्थ व मानसिक प्रसन्नता असताना वाचन करावे.
- वाचनाचा उत्साह असतो तेंव्हा कठीण असणारा विषय प्रथम वाचवा.
- कोणत्याही विषयाचे शास्त्रीय लेखन हे संकल्पनात्मक असते त्यामुळे प्रारंभीच्या संकल्पना समजल्याशिवाय पुढचा मजकूर वाचू नये.
- शब्दसंग्रह वाढवावा, गरजेनुसार शब्दकोश, म्हणी, वाक्यप्रचार, संकल्पना कोश यांचा वापर करावा.
- वाचलेल्या मजकुराचे मनन, चिंतन करावे, त्यासंबंधी इतरांशी चर्चा करावी
- वाचनात सातत्य असावे.
- वाचन हे आनंददायी असते हे स्वतःला पुनःपुन्हा सांगावे.
- वाचताना इतर गोष्टी करणे टाळावे.
- वाचताना मनात येणारे विचार प्रयत्नपूर्वक टाळावेत.
- मन एकाग्र करून वाचावे.

# उत्तम वाचनाची पद्धती

- विद्यार्थ्यांसाठी उत्तम वाचनाची एक प्रचलित पद्धती आहे तिला SQRR असे संबोधले जाते.
- सर्वेक्षण (SURVE)
- प्रश्न (QUESTION)
- वाचन ( REDING)
- आठवणे (RECALL)
- पुनरावलोकन (REVIEW)

# भाषण

- भाषण म्हणजे एका व्यक्तीने आपल्या मनातील विचार योग्य शब्दात व प्रभावी शैलीत मांडणे होय.
- भाषणातून व्यक्तीचे विचार व त्याच्या मनातील भावना यांची अभिव्यक्ती होते.
- आपल्या मनातील विचार, प्रश्न यांची योग्य शब्दात मांडणी करता येणे हे व्यवहारात गरजेचे असते.
- ‘आपले विचार स्पष्ट, मुद्देसूद, परिणामकारक, साभिनय व्यक्त करण्याची कला म्हणजे भाषण’
- भाषण कौशल्य म्हणजे मनातील विचार वाणीद्वारे मांडण्याची क्रिया होय.

# भाषण कौशल्य विकासाचे उपाय

- प्रथम घरात, मित्रांमध्ये बोलते व्हावे. काय बोलू, कसे बोलू हा संकोच मनातून काढून टाकावा.
- सोप्या वाटणाऱ्या विषयावर समूहासमोर स्वमत प्रकट करावे.
- जाणत्यांनी बोलण्यातील चूक दाखविली तर त्यावर विचार करावा. चुकीचे समर्थन करू नये.
- एकांतात मोठ्याने बोलण्याचा सराव करावा, त्यामुळे भीती निघून जाते. उच्चार सुधारतात.
- श्रोतासमूह यांचे मनावर दडपण घेऊ नये, मनात असेल ते स्पष्ट, स्वच्छ व मनमोकळेपणाने बोलावे.
- बोलताना वाक्यांची पुनरावृत्ती टाळावी

# लेखन

- लेखन ही दीर्घकाळ टिकून राहणारी भाषिक कृती आहे, त्यामुळे लेखन हे विचारपूर्वक आणि जबाबदारीने करावे अशी अपेक्षा असते.
- लेखनामुळे हजारो वर्षांचे ज्ञान लिपीबद्ध होऊन सुरक्षितपणे जतन करणे शक्य झाले आहे.
- लेखन ही व्यक्तीने विचारपूर्वक केलेली अभिव्यक्ती असते.
- भाषिक कौशल्यात लेखनाला खूप महत्व आहे.
- भाषेच्या अध्यापनात लेखन कौशल्याकडे विशेष लक्ष दिले जाते.
- लेखनाचे औपचारिक आणि अनौपचारिक लेखन असे दोन प्रकार पडतात.

# लेखन कौशल्य विकासाच्या क्षमता

- सुलेखन
- जलद लेखन
- मुद्देसूद व सुसूत्र लेखन
- शैलीदार लेखन
- लेखनविषयक नियमांचे पालन
- व्याकरणशुद्ध लेखन
- विरामचिन्हे
- शब्दभांडार